अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिंद क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र






वर्ष ४३ वे

अंक १ ला

१० जानेवारी २०२२

किंमत १ रूपया

"प्रजासत्ताक दिनाच्या व मकरसंक्रांतीच्या संस्थेतर्फे हार्दिक शुभेच्छा !"

# सुखांत जीवनाचा

लेखक : ॲड. अविनाश जनार्दन भिडे, नाशिक

स्वत:च्या आयुष्याच्या शेवटाबाबत प्रत्येकाच्या कल्पना वेगवेगळ्या असतात, अर्थात तो रुग्ण त्यावेळी समजून घेण्याच्या मन:स्थितीत, शुद्धीवर असेल तर ! कोणाला आपल्या आप्त स्वकियांच्या, मुला नातवंडांच्या सान्निध्यात अंत व्हावा असे वाटते, कोणाला एकांत असावा, आपला कोणाला त्रास होऊ नये असे वाटते, कोणाला शेवटपर्यंत औषधोपचार व्हावेत, हॉस्पिटलमध्ये असावे असे वाटते. परंतु आपले मरण शांतपणे यावे असे मात्र सर्वांनाच वाटते. अशा स्वरूपाच्या रुग्णाच्या इच्छा जेवढ्या शक्य होईल तितक्या पूर्ण होतील हे बघणे हेही या पॅलीएटीव्ह केअर स्वरूपात मोडते.

रुग्णास श्वसनाचा त्रास होत असेल तर त्यास कृत्रिम श्वासोच्छवास न देता नैसर्गिकरित्या श्वासोच्छवास कसा सुसह्य होईल हे बघणे. रुग्णाचे डोळे, तोंड, ओठ कोरडे पडत असतील तर डोळ्यात वैद्यकिय सल्ल्यानुसार ठराविक काळाने औषध टाकणे, ओठांना लीपबाम किंवा तत्सम मलम लावणे, चेहऱ्यावर अतिशय पातळ, दमट कपडा हलकेच काही वेळासाठी ठेवणे, कातडी शुष्क, सुरकुतलेली झाली असेल तर त्याला मलम लाऊन ती मऊ कशी राहील ते बघणे. कातडीवर बेड सोअर, छाले पडू नयेत म्हणून वॉटर बेडची व्यवस्था किंवा शक्य होईल तसे अधूनमधून रुग्णाला ह्या किंवा त्या कुशीवर हलविणे. असे प्रयत्न पॅलीएटीव्ह केअरचा भाग आहे.

रुग्णाला मळमळ, उलटी, अपचन किंवा भूक लागत नसेल तर वैद्यकिय सल्ल्यानुसार अधूनमधून थोडे थोडे अन्न किंवा पाणी/द्रव पदार्थ देणे आवश्यक आहे. जास्त खाऊन अपचन होण्यापेक्षा थोडे थोडे खाऊन अर्धपोटी असणे रुग्णासाठी जास्त सुसह्य असते. रुग्णाच्या इच्छेप्रमाणे, त्याचे आवडीचे अगदी थोडे पदार्थ खाऊ घालण्यात आप्त स्वकीयांना व रुग्णालाही त्या अवस्थेत सुखकारक समाधान देणारे असते. रुग्णाच्या अशक्त पणात त्याच्या कमीत कमी हालचाली. कशा होतील हे बघणे महत्वाचे आहे.

गंभीर स्वरूपाच्या आजारात किंवा अशा आजाराच्या शेवटच्या टप्प्यावर रुग्णाला दु:ख शामक उपचार होण्यासाठी रुग्ण व त्यांचे नातेवाईक मनाने जास्तीत जास्त शांत रहाणेही अत्यंत गरजेचे असते. ही अवस्था कुटुंबियांसाठी खूप अवघड असते. आपला प्रेमाचा, जवळचा माणूस काही कालावधीत मरणार आहे ही भावना असह्य, दु:खदायक असते. अशा अवस्थेत पेशंटची काळजी घेणे पण अवघड असते. परंतु त्यामध्ये समाधानही असते की शेवटच्या काळात मी माझ्या माणसाची सेवा सुश्रृषा केली, त्याला कसा आराम मिळेल, कमीत कमी दु:ख होईल हे पाहिले, रुग्ण आप्तस्वकीयांत होता, शेवटपर्यंत आपल्याशी बोलत होता, किंवा डोळ्यासमोर होता, मी माझ्या हाताने त्यांना चार घास खाऊ घातले, पाणी पाजले, वगैरे भावना रुग्णाच्या जवळच्या लोकांना नंतर समाधान देणाऱ्या असतात नाही का?

**लिव्हींग विलचा एक नमुना -**

लिव्हींग विल किंवा वैद्यकिय इच्छापत्र कसे करायचे, त्याचे स्वरुप कसे असावे हा प्रश्न सर्वांनाच पडेल. त्यासाठी तज्ञ वैद्यकिय व्यवसाईकाची तसेच तज्ञ वकिलाची मदत घेणे नक्कीच उपयोगाचे ठरेल. पण तरी सुद्धा ढोबळ मानाने वैद्यकिय इच्छापत्र लिव्हींग विल कसे असावे त्याचा नमुना दिला आहे. हा नमुना केवळ माहितीसाठी दिला आहे.


**Shree Parshuram Nagari Sahakari Patsanstha Ltd.**

Kaka Gadre Mangal Karyalaya,
Gole Colony, Nashik. Ph. No. 0253 - 2313709

**RATE OF INTEREST FROM 12/10/2020**

| No. | Period | Rate | Type | Type |
|---|---|---|---|---|
| 1. | Savings | 3.00% | Six Monthly | |
| 2. | 30 Days To 180 Days | 3.00% | Simple | |
| 3. | 181 Days To 12 Months | 4.50% | Simple | |
| 4. | 13 Months To 36 Months | 7.00% | Reinvest | Mis |
| 5. | Recurring (R.D.) 12 Month & Above | 7.00% | Reinvest | |

**13 Months & Above 0.50% Extra Interest For Senior Citizen**

## वैद्यकिय इच्छापत्र / लिव्हींग विल

स्थळ :

दिनांक :

संपूर्ण नाव : ..........................................................................

वय (जन्मतारीख) : .............................................................

पत्ता : ...................................................................................

सध्याचा व्यवसाय : ..............................................................

फॅमिली डॉक्टरचे नाव : .........................................................

पत्ता : ...................................................................................

फोन / मोबाईल नंबर : .........................................................

जवळचे नातेवाईक : ............................................................

१) नाव, पत्ता, काय नाते संबंध, फोन नं.: ...............................

२) नाव, पत्ता, काय नाते संबंध, फोन नं.: ...............................

गार्डियन (नेमावयाचा असल्यास) ...........................................

नाव, पत्ता, कशी ओळख? फोन नंबर : ...................................

आजाराचे स्वरूप : ...............................................................

आजाराचे निदान कधी झाले : ................................................

वैद्यकिय इच्छा : ...................................................................

* झालेल्या आजारामध्ये औषधोपचार घेत असताना यदाकदाचित आजार वाढत गेला व त्याचे स्वरूप खूप गंभीर झाले म्हणजे यापुढे कितीही व कोणताही औषधोपचार केला तरी आजार बरा होणार नाही अशा वेळेला किंवा औषधोपचारादरम्यान माझा (त्या आजारी व्यक्तीचा) ब्रेन डेड झाला किंवा मी परमनन्ट व्हेजिटेटिव्ह स्टेज (PVS) मध्ये गेलो म्हणजे मी कोमामध्ये गेलो, केवळ कृत्रिम श्वासोच्छवास द्यावा लागतोय अशा अवस्थेत गेलो तर माझ्यावर रोग बरा होण्यासाठी करावा लागणारा सर्व औषधोपचार, कृत्रिम श्वासोच्छवास यंत्रणा व इतर सर्व यंत्रणा थांबवाव्यात.
* मी जर त्यावेळी शुद्धीत असेन तर सर्व औषधोपचार थांबवून मला माझ्या घरी, जवळच्या नातेवाईकांबरोबर उरला सुरला कालावधी घालवण्याची इच्छा आहे.
* या इच्छापत्रातील सर्व मजकूर मी पूर्णपणे समजून उमजून लिहिलेला आहे. यामध्ये लिहिलेल्या इच्छेमुळे माझा औषधोपचार थांबून नैसर्गिकरित्या लवकरात लवकर मरण येईल याची मला पूर्ण जाणीव आहे. तरी सुद्धा हे वैद्यकिय इच्छापत्र मी लिहून ठेवतो आहे.
* इच्छापत्र करण्यासाठी माझ्यावर कोणाचेही दडपण, दबाव नाही. मी कोणत्याही आमिषाला बळी पडून इच्छापत्र लिहून ठेवत नाही किंवा त्यावर सही केलेली नाही.
* हे इच्छापत्र लिहून ठेवल्याबाबतची संपूर्ण माहिती मी माझ्या, वर नमूद केलेल्या नातेवाईकांना व फॅमिली डॉक्टरांना सांगितलेली आहे.
* येथे साक्षीदार म्हणून हजर असलेले

  १) श्री., नाव, वय, पूर्ण पत्ता, फोन नंबर –

  २) श्री., नाव, वय, पूर्ण पत्ता, फोन नंबर –

  हे माझ्या परिचयाचे आहेत. त्यांच्या समक्ष मी या इच्छापत्रावर सही करीत असून माझ्या समक्ष ते सह्या करीत आहोत.
* हे इच्छापत्र (मी माझ्या हाताने) लिहिलेले असून ते मी पूर्ण वाचून पाहिले आहे व समजून घेतलेले आहे.
* यापूर्वी मी कोणतेही वैद्यकिय इच्छापत्र केलेले नाही.
* हे इच्छापत्र यापुढे परिस्थिती बदलल्यास मी रद्द करू शकतो ह्याची मला पूर्ण जाणीव आहे.
* इच्छापत्र करण्याऱ्या व्यक्तीची सही / दिनांक
* त्याखाली प्रत्येक साक्षीदारांनी स्वहस्ताक्षरात (शक्य असल्यास) खालीलप्रमाणे मजकूर लिहून त्याखाली स्वत:ची सही करून तारीख टाकावी.

  माझ्या समक्ष श्री/श्रीमती (इच्छापत्र लिहून ठेवणाऱ्या व्यक्तीचे नाव) यांनी या इच्छापत्रावर सही/अंगठा केला असून मी त्यांच्या समक्ष व दुसरे साक्षीदार श्री/श्रीमती (दुसऱ्या साक्षीदाराचे नाव) यांच्या समक्ष साक्षीदार म्हणून सही करीत आहे.

  साक्षीदार नं. १ सही/दिनांक

  पूर्ण नाव, वय, पत्ता, फोन नंबर

(वरील प्रमाणे सर्व मजकूर साक्षीदार नं. १ यांनी स्वहस्ताक्षरात लिहावा)

साक्षीदार नं. २ सही/दिनांक

पूर्ण नाव, वय, पत्ता, फोन नंबर

* इच्छापत्र करणारी व्यक्ती ते करण्याच्या शारीरिक व मानसिक मन:स्थितीत असल्याचा वैद्यकिय दाखला इच्छापत्रावर दिलेला असावा.
* (इच्छापत्रात खाली ज्या प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी (न्यायाधीश) यांच्यासमोर सह्या करावयाच्या आहेत त्यांच्यासाठी त्यांची स्वत:ची नोंद घेण्यास व सही/शिक्का मारण्यास जागा असावी.)
* इच्छापत्राच्या कमीत कमी सहा मूळ प्रती असाव्यात.

– एक प्रत न्यायाधीश साहेबांकडे असावी.

– एक प्रत जिल्हा न्यायालयाचे रजिस्ट्री ऑफिसमध्ये असावी.

– एक प्रत फॅमिली डॉक्टरकडे असावी.

– एक प्रत मा. उच्च न्यायालयाचे रजिस्ट्री विभागात असावी.

– एक प्रत स्थानीय प्रशासन, कलेक्टर / महानगरपालिका, नगरपलिका, ग्रामपंचायत यांच्याकडे असावी.

– उर्वरित प्रती इच्छापत्र करणाऱ्याकडे किंवा त्यांच्या नातेवाईकांकडे असाव्यात.

* इच्छापत्र स्पष्ट शब्दात पण सोप्या भाषेत असावे. ते व्यक्तीच्या स्वहस्ताक्षरात असेल तर उत्तम. ते शक्यतो इच्छापत्र करणाऱ्या व्यक्तीच्या बोली भाषेत असावे.
* त्यासाठी वापरावयाचा कागद चांगला व स्वच्छ असावा. (शक्यतो लेजर पेपर वापरावा.) ते जतन करण्यासाठी प्लॅस्टिक फोल्डर किंवा फाईल मध्ये असावे/ठेवावे.
* वैद्यकिय उपचारांसाठी हॉस्पिटलमध्ये दाखल होताना भरावयाच्या फॉर्मवर वैद्यकिय इच्छापत्र केलेले असल्याची नोंद करावी.

* * *

## * चित्तपावन ब्राह्मण संघ नाशिक संस्थेतर्फे व्रतबंध सोहळा *

सालाबादप्रमाणे या ही वर्षी संस्थेतर्फे सामुदायिक व्रतबंधन सोहळा आयोजित केला आहे. हा सामुदायिक व्रतबंधन सोहळा सर्व शाखीय ब्राह्मण समाजातील मुलांसाठी आहे. त्यासाठी मुलांच्या वयाची अट नाही नसेल. **प्रवेश शुल्क रु. ४,५००/–** त्यात बटु सह पाच जणांचा समावेश असेल. प्रत्येक जादा व्यक्तीसाठी चहा, नाश्ता व भोजन **शुल्क २५०/–** असेल. नाव नोंदणी झाल्यावर पालकांनी आणावयाच्या साहित्याची यादी प्रवेश शुल्क भरल्यानंतर देण्यात येईल.

व्रतबंध समारोह काका गद्रे मंगल, गोळे कॉलनी या ठिकाणी होईल. अधिक माहितीसाठी संस्थेच्या काका गद्रे मंगल कार्यालयात, सकाळी १० ते १ व दुपारी ४ ते ७.३० या वेळेत संपर्क साधावा. संस्थेतर्फे फोटोग्राफरची व्यवस्था करण्यात आली आहे.

व्रतबंध कार्यक्रम एप्रिल / मे २०२२ महिन्यात आयोजित करण्यात येईल, त्या संबंधीची माहिती लवकरच सर्वांना कळविण्यात येईल.

**कोरोना / ओमयक्रॉनबाबत योग्य ती उपाय योजना करून शासकीय आदेश नियमानुसार**

## * देणगी *

**सौ. अंजली गाडगीळ,** नाशिक यांचेकडून **श्रीमती इंदुमती गाडगीळ** यांचे स्मृतीप्रित्यर्थ, वैद्यकीय मदतीसाठी देणगी **रु. ३,०००/–** संस्थेतर्फे ब्रृतज्ञाता पूर्वक स्विकार आणि देणगीदारांचे मन:पूर्वक आभार.

**कोरोना / ओमयक्रॉनच्या संकटावर मात करण्यासाठी प्रत्येकाने व्यक्तिगत पातळीवर प्रयत्न करावा. यासाठी सुरक्षित अंतर पाळा. मास्कचा वापर करा. सॅनिटायझरचा वापर करा. स्वच्छ पाण्याने - साबणाने नियमाने हात धुवा. आपल्या स्वत:साठी आणि आपल्या कुटुंबासाठी ‘काळजी’ घ्या...**

।।श्री जय जगन्नाथ।।

खरे टूर्स

१२ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी २०२२

## अप्रतिम कर्नाटका

मनगोड मॉनेस्ट्री, आर्यादूर्गा व महामाया मंदीरं, गोकर्ण,
मुर्डेश्वर मिर्झान फोर्ट, जोग फॉल, याना

निवासः ३ रात्र निसर्ग सानिध्यात (रिसॉर्ट-२५ एकर) व २ रात्र समुद्र सानिध्यात

३ मे ते १४ मे २०२२

## काश्मिर, अमृतसर - वैष्णोदेवी
## श्रीनगर - ४ रात्री , पहलगाम - २ रात्री

काश्मिरः चंदनवाडी आणि बेताब व्हॅली

अमृतसर : गोल्डन टेम्पल, दुर्गियाणी मंदिर, ऐतिहासिक जालियनवाला बाग, सुप्रसिद्ध अटारी (वाघा) बॉर्डर

श्रीनगर : शिकारा राईड, तरंगत्या बागा, चारचिनार, मुगल गार्डन (शालिमार, निशांत व चश्मेशाही)

शंकराचार्य टेम्पल, हजरतबल दर्गा, गुलमर्ग, सोनमर्ग, पेहेलगाम मार्तंड मंदिर

१८ मे ते १ जुन २०२२

## सिक्किम, दार्जिलिंग, कलकत्ता, लाछुंग-युमथांग

सिक्कीम : गंगटोक, पलॉवर शो, रांका मॉनेस्ट्री, हनुमान टोक, तिस्ता व्ह्यू पॉईंट

दार्जिलिंग : जवाहर पर्वत श्रृंखलेमध्ये वसलेले प्राणी संग्रहालय - पद्मजा नायडू झूऑलॉजिकल पार्क, रॉक गार्डन, टायगर हिल (सूर्योदय), माउंटेनिअरिंग इन्स्टिट्यूट, जमल्यास पशुपती नगर (नेपाळ)

रेल्वे रिझर्वेशन १२० दिवस अगोदर किचन स्वतःचे असेल

**संपर्क : शर्मिला खरे ९८१९०३१४३३ / सतीष खरे ९८१९६११८६९**

तळमजला, कल्पद्रुम प्रासाद, बालक मंदिर शाळेजवळ, दत्त आळी, कल्याण (प) दूरध्वनी : २२०८६३७

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वधू यादी

| अ.क्र. | नाव पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **कु. शुभ्रा दत्तात्रय जोशी**<br>फ्लॅट नं. ४, अर्जिता अपार्टमेंट, इंदिरानगर, गजानन महाराज मंदिराजवळ, नाशिक - ४२२ ००९.<br>मो. : ९५५२०७६८५८. | २०/०८/१९९४ | हरितस | ५'.१'' | M.E. Com. Science. | ४०,०००/- |
| २. | **कु. डॉ. रिद्धी माधव देशपांडे**<br>प्लॉट नं. १५१, रामरक्षा बंगला, सम्राट सिंफनी बिल्डींगजवळ, नागरे नगर, नाशिक - ४२२ ००९.<br>मो. : ९९२०४०११०७. | ०२/०७/१९९५ | हरितस | ५' | B.H.M.S.<br>M.D. करते आहे. | --- |

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वर यादी

| अ.क्र. | नाव पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **अनुराग अनिल फडणीस**<br>आय-८, ठक्कर रिट्रीट, जुना गंगापूर नाका, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ०१३.<br>मो. : ९८२३६६२६६५. | ०५/०५/१९८२ | जमदग्नी | ५'.२'' | B.E. (Elect) | ४२,०००/- |
| २. | **तेजस युवराज भट**<br>०९, तुलसी 'अ' जयपूर हाऊस समोर, पारिजात नगर, नाशिक - ४२२ ००५.<br>मो. : ९७६४७७१४५९. | १३/०२/१९९३ | यजुर्वेदी | ५'.१०'' | B.E. (Mech) | ८-१० लाख /- वार्षिक |
| ३. | **पराग श्रीकर सोहनी**<br>फ्लॅट नं. ७, राजधानी अपार्टमेंट, जाखडी नगर, इंदिरानगर, नाशिक - ४२२ ००९.<br>मो. : ९८५०७४४७२२. | ०७/०२/१९८८ | वत्स | ५'.५'' | M.Com | २५,०००/- |
| ४. | **सुमित सुहास कुलकर्णी**<br>फ्लॅट नं. १३, श्री. साई निकेतन हौ. सो., गंधर्वनगरी, नाशिकरोड - ४२२ १०१.<br>मो. : ९४२२७४६२२९. | १७/०३/१९९० | ऋग्वेदी | ५'.८'' | Hotel Manage-ment Degree | १,८०,०००/- मासिक |
| ५. | **श्रेयस प्रदीप शिधये**<br>फ्लॅट नं. १८, आनंदवन सोसा., तारवाला नगर, दिंडोरी रोड, मेरी, नाशिक - ४२२ ००४.<br>मो. : ९९२२५०३१९१ | १५/०७/१९९२ | शांडिल्य | ५'.६'' | B.E. Civil | २५,०००/- |

## डॉ. यशवंत बर्वे यांचे निधन



**कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे माजी विश्वस्त डॉ. यशवंत बर्वे** (वय ९२) यांचे बुधवारी, दि. ०८ डिसेंबर २०21 निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुलगे, सुना, मुलगी असा परिवार आहे. मृत्यू पश्चात त्यांचे देहदान करण्यात आले.


डॉ. बर्वे यांच्या जीवन कार्यावर विनोबा भावे, साने गुरुजी, बाबा आमटे अशा समाजसेवकांच्या विचारांचा प्रभाव होता. वैद्यकिय क्षेत्रातील पदवी मिळाल्यानंतर त्यांनी नांदगाव येथे खासगी व्यवसाय सुरू केला. यासह त्यांनी वि. जे. हायस्कूल, ना. शि. प्रसारक मंडळ, आयुर्वेद सेवा संघातही काम केले. कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे आदिवासी विभागात त्यांनी वैद्यकिय शिबिरे आयोजित केली. बर्वे यांना 'धन्वंतरी', 'साने गुरुजी', वैद्य शंकर शास्त्री दाजी कार्यकर्ता' आदी पुरस्कारांनी गौरविण्यात आले. संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

## ❊ दु:खद निधन ❊



आपल्या संस्थेचे ज्येष्ठ सभासद आणि नाशिकचे सुप्रसिद्ध गॅस विक्रेते प्रकाश वैशंपायन यांच्या पत्नी **सौ. जान्हवी वैशंपायन** यांचे वयाच्या ६४ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. आधाराश्रम, प्रबोधिनी विद्या निकेतन, सार्वजनिक वाचनालय, न्यू एज्युकेशन सोसायटी या संस्थांवर त्यांनी काम केले आहे. संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.


आपल्याला दुसऱ्याचे बोलणे समजत नाही का?
होय....! तर आपल्या कानाच्या तपासणीसाठी...



एक उपयुक्त दागिना...!

अनेक नावाजलेल्या कंपन्यांचे श्रवणयंत्र उपलब्ध

अदृश्य श्रवणयंत्र

अनुभवी तज्ञांचे मार्गदर्शन

मंडळाच्या आजीवन सभासदांसाठी **विशेष सुट**

**संपर्क : डॉ. श्री व सौ. वैद्य**
**संवाद स्पीच ॲण्ड हिअरिंग क्लिनिक**
फ्लॅट नं. १, पहिला मजला, प्रधान पार्क, एम.जी. रोड, नाशिक.
**Ph.: 2318333, Mob : 9422269394**

**शाखा :** हेरिटेज अपार्टमेंट, म्हसोबा मंदिराच्या समोर, VLCC जवळ, जेहान सर्कल, गंगापूर रोड, नाशिक

* अटी लागू



निवासी, व्यापारी, औद्योगिक संकुल बांधकाम, प्लॉट डेव्हलपमेंट यातील विश्वसनीय नाव

# मिहिर कन्स्ट्रक्शन

**सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर**

**ऑफिस :** २, प्रसाद रेसिडेन्सी, माणेकशा नगर, रत्नपारखी हॉस्पिटलजवळ, द्वारका, नाशिक.
फोन : २५९०७५४

**सी. व्ही. रानडे,** बी.ई. (सिव्हिल)

**मोबाईल :** ०९४२२२४६८७८
**ईमेल :** cvranade@gmail.com

## श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था व टकले बंधू यांच्या संयुक्त विद्यमाने

# सुवर्ण संचय समृद्धी योजना

बघता बघता वर्ष-दोन वर्षावर मुला मुलींचं लग्न येऊन ठेपलं आहे!
गुंतवणुकीचा उत्तम व खात्रीशीर पर्याय शोधत आहात ?
सोने खरेदी करायचे आहे? शेअर मार्केट धक्के देतंय?
पण महागाई व वाढत्या भावामुळे शक्य होत नाहिये?

**थांबा, काळजी करू नका, आपली ही काळजी दूर झाली आहे.**

तुमच्या सोयीने हवे तेवढे सोने आजच खरेदी करा. ते पण सोन्याच्या आजच्या भावाच्या फक्त २५% रक्कम भरून. उर्वरित रकमेची सुलभ मासिक हप्त्यांमध्ये एका वर्षात परतफेड करा.
लग्नात लागणारी अपरिहार्य गोष्ट किंवा वर्षानुवर्षांपासून सिद्ध झालेला उत्तम गुंतवणुकीचा पर्याय म्हणून देखील सोने हाच पर्याय आहे.

## आमचे ध्येय... “तुमची धनसमृद्धी”

अधिक माहितीसाठी आजच संपर्क करा.

**श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था**
फोन : (०२५३) २३१३७०९/ ९१६८४२६८८८

**टकले बंधू, सराफ बाजार**
फोन : ०२५३-२५९४१५४, २५९६६५४, २५९९०५४

**विचार कसला करताय, येताय ना मग !**


चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व प्रकाशक श्री.विजय राजाराम साने, यांनी मीरा एंटरप्राईजेस, २, जयश्री अपार्टमेंट, ठाकरे बंगला, गंगापूर रोड, नाशिक- २ येथे छापून काका गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक-४२२००२ येथे प्रसिद्ध केला.
**गद्रे मंगल कार्यालय, फोन : ०२५३ - २५७६२४१**

प्रति, ______________________

______________________

______________________

**संस्थेची वेबसाईट :-**

- Website : www.nasikchitpavan.org
- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://facebook.com/nasikchitpavan
- http://youtube.com/user/nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. ‘चित्तपावन मित्र’ च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O मधून वितरित केला जातो.